दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक २८१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.५ जानेवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## सिंधूताई सपकाळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दै.रायगड नगरी । पुणे**




'अनाथांची माय' अशी ओळख असलेल्या सिंधूताई सपकाळ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने मंगळवारी निधन झालं आहे. पुण्यात खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे सपकाळ यांना महिन्याभरापूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

सिंधूताई सपकाळ यांच्यावर हर्नियाची शस्त्रक्रिया झाली होती. सामाजिक कार्याचा सन्मान म्हणून जानेवारी २०२१ मध्ये सपकाळ यांना केंद्र सरकारतर्फे पद्मश्री किताब जाहीर झाला आणि मध्यंतरी त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये कोरोनाचा उद्रेक एका दिवसात ५२१ रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड परिसरात मंगळवारी करोना रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ नोंदवली गेली. गेल्या २४ तासांमध्ये रायगड जिल्ह्यात ७०२ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. यापैकी सर्वाधिक रुग्णसंख्या ही पनवेलमध्ये आहे. एकट्या पनवेलमध्ये दिवसभरात ५२१ रुग्णांची नोंद झाली. तर एका करोना रुग्णाचा मृत्यू झाला. त्यामुळे आता करोनाच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटने शहरी भागासोबत ग्रामीण भागातही हातपाय पसरायला सुरुवात केल्याचे संकेत मिळत आहेत. ठाणे जिल्ह्यात दिवसभरात ४२२ नवे करोना रुग्ण आढळले. यामध्ये कल्याणमधील १६०, डोंबिवलीतील २४७, टिटवाळा ११, पिसवली २ आणि मोहनामधील दोन रुग्णांचा समावेश आहे. या परिस्थितीमुळे रायगड आणि



ठाण्यातील आरोग्य यंत्रणांची धाकधुक वाढली आहे.

तर दुसरीकडे मुंबईसह महाराष्ट्रातही करोनाचा धडकी भरवणारा आकडा समोर आला आहे. गेल्या २४ तासांत महाराष्ट्रात १८४६६ नव्या करोना रुग्णांची नोंद झाली. तर २० जणांचा मूत्यू झाला. यापूर्वी सोमवारी नव्या करोना रुग्णांची संख्या तब्बल १२ हजार इतकी होती. मात्र, एकाच दिवसात नव्या करोना रुग्णांची संख्या आठ हजाराने वाढली आहे.

मुंबईसह राज्यात ओमायक्रॉनच्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. आज राज्यात ७५ ओमायक्रॉनबाधित रुग्ण आढळले आहेत. एकट्या मुंबईतच ४० जणांना संसर्ग झाला आहे. गेल्या २४ तासांत मुंबईत १०८६० नवे करोना रुग्ण आढळले आहेत. तर करोनाचा डबलिंग रेट अवघ्या ११० दिवसांवर आला आहे. काल हाच डबलिंग रेट १८३ दिवसांचा होता. तर मुंबईतील करोना रुग्णवाढीचा दर ०.६३ टक्के इतका आहे. मुंबईत सध्या ४७,४७६ करोना रुग्णांवर उपचार सुरु आहेत. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण घसरुन ९२ टक्क्यांवर आले आहे. तर गेल्या २४ तासांमध्ये ६५४ जणांना डिस्चार्ज मिळाला आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रातील शाळा बंद ठेवण्याचा आयुक्तांचा आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई, नवी मुंबई पाठोपाठ पनवेल महापालिका क्षेत्रातील इयत्ता दहावी आणि बारावीचे वर्ग वगळता सर्व माध्यमाच्या शाळा बंद ठेवण्याच्या आदेश देण्यात आले आहेत. मात्र ऑनलाइन शिक्षण नियमितपणे सुरू राहणार आहेत. पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.



राज्यासह पनवेल महापालिका क्षेत्रातही पुन्हा एकदा कोरोनाच्या रुग्णसंख्येमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून राज्य सरकारच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

मात्र, इयत्ता दहावी आणि बारावीचे वर्ग यापुर्वी दिलेल्या निर्देशानुसार सुरू राहणार आहेत, असे या आदेशात म्हटले आहे. दरम्यान, कोविड नियमांचे पालन करून १५ ते १८ वयोगटातील मुलांना लसीकरणासाठी बोलावण्यात येणार असून हे लसीकरण पुर्ण होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रामुख्याने लक्ष देण्याचे सुचित करण्यात आले आहेत.

## पनवेल तालुका पत्रकार महासंघ करणार जागतिक किर्तीच्या विजेत्यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मराठी भाषेतील आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून दि. ६ जानेवारी रोजी देशभरात पत्रकार बांधव विविध कार्यक्रम आयोजित करत असतात. यावर्षी पत्रकार दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे अपंगत्वावर यशस्वीरीत्या मात केलेल्या जागतिक किर्तीच्या विजेत्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला असल्याचे पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी सांगितले.

नवीन पनवेल येथील के.आ. बांठीया विद्यालयाच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता आयोजी केलेल्या सोहळ्यासाठी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, जेष्ठ सल्लागार सुनील पोतदार, जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, के.आ. बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी, माजी अधिक्षक मिलिंद जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शो शॉर्टेस्ट बॉडी बिल्डर स्पर्धेत रायगड भूषण, अलिबाग भूषण, भारत श्री यासारख्या विविध स्पर्धांमध्ये दैदिप्यमान यश मिळवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या प्रतिक विठ्ठल मोहिते यांचा तसेच अलिबाग झिराड श्री, पुणे ज्युनिअर महाराष्ट्र श्री, पनवेल महापौर श्री, भारत श्री, दिव्यांग भूषण, वीर जिजामाता पुरस्कार सन्मानित कनकेश्वर पांडुरंग रसाळ तर स्वमग्नतेवर मात करून ३० पेक्षा अधिक शिष्यवृत्ती संपादन करून १० इयत्तेत ९१% गुण, किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना परिक्षेत अपंगांमध्ये देशात पहिला, गणित विषयात मास्टर पदवी असे नेत्र यश संपादन करून गणित विषयात पी.एच.डी. करण्याचा मानस असलेल्या जतिन सुरेश पाटील यांचा सन्मान होणार आहे. तरी या अनोख्या सोहळ्यासाठी पत्रकार बंधू-भगिनींसह समस्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे करण्यात आले आहे.

## नैना प्रकल्प शेतकऱ्यांवर जबरदस्तीने लादल्यास शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिती, पनवेल यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण पुकारण्यात आले. या उपोषणाची दखल घेतली गेली नाही तर मोठ्या प्रमाणावर मोर्चा काढ़णार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नैना (सिडको) गेली आठ वर्षे शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायामुळे हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी शेतकऱ्यांतर्फे करण्यात आली. या उपोषणला आमदार बाळाराम पाटील, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी उपस्थिती दर्शवून पाठिंबा दर्शविला.



नैना प्रकल्प बाधित शेतकऱ्यांचा नैना विरोधी सूर कायम आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मानगुटावर 'नैना' नावाची मोठी राक्षसीन बसली असून तिचा नाश करायचा असून तिला तालुक्यातुन हद्दपार करायची आहे असा ठाम निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे. नैना प्रकल्पामुळे शेतकरी उध्वस्त होणार असून या प्रकल्पाला शेतकऱ्याचा ठाम विरोध असल्याचे यावेळी सांगण्यात आले. २०१३ साली नैना (सिडको) प्रकल्प जाहीर झालेला आहे. परंतु या प्रकल्पाच्या माध्यमातून कुठेही विकास कामे झालेली नाहीत. व व्यावसायिकांना सुध्दा या प्रकल्पाने वेठीस धरले आहे. नैना (सिडको) शेतकऱ्याची ६० टक्के जमीन विनामोबदला घेत आहे. व ४० टक्के जमिन शेतकऱ्यांकडे राहणार आहे. त्यासाठी नैना (सिडको) लाखो रुपये प्रतिगुंठा …/२

## संक्षिप्त…

### दिवसभरात १८ हजाराहून अधिक रुग्ण, २० जणांचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात पुन्हा एकदा कोरोनाचा कहर पाहायला मिळत असून गेल्या २४ तासांत तब्बल १८ हजार ४६६ नव्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर २० जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील कोरोना रुग्णवाढीचं मुंबई हे केंद्र ठरताना दिसत आहे. मुंबईत आज १० हजाराहून अधिक रुग्णवाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत राज्यात ४ हजार ५५८ जणांनी कोरोनावर मात केली आहे. राज्यात सध्या ६६ हजार ३०८ सक्रिय रुग्ण आहेत.

राज्यात दिवसभरात ७५ नवे ओमायक्रॉनचे रुग्ण आढळून आले आहेत. यातील ४० रुग्ण एकट्या मुंबईतील आहेत. राज्यातील ओमायक्रॉनच्या एकूण रुग्णांचा आकडा ६५३ इतका झाला आहे. यातील ४०८ रुग्ण मुंबईत आहेत. तर पुण्यात ७१ रुग्णांची नोंद आहे. कोरोनाच्या सुरुवातीपासूनची आकडेवारी पाहिली तर राज्यात आतापर्यंत ६७ लाख ३० हजार ४९४ कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी ६५ लाख १८ हजार ९१६ रुग्ण कोरोनातून पूर्णपणे बरे झाले आहेत. कोरोनामुळे झालेल्या मृत्यूची संख्या १ लाख ४१ हजार ५७३ झाली आहे.

## विरार अलिबाग बहूउद्देशिय मार्गाला जमिनी देण्यास उरणच्या शेतकऱ्यांचा विरोध

**दै.रायगड नगरी । उरण**

विरार अलिबाग बहूउद्देशिय मार्गाला जमिनी देण्यास उरणच्या शेतकऱ्यांनी विरोध करण्याचे ठरविले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी पनवेलचे उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके यांच्या अध्यक्षतेखाली काल उरण पंचायती सभागृहात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेस शेतकऱ्यांनी जोपर्यंत शेतकऱ्यांना या प्रकल्पाची संपूर्ण माहिती आणि जागेचा योग्य मोबदला मिळण्याचे ठोस आश्वासन मिळत नाही तोपर्यंत या प्रकल्पाला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.

एमएसआरडीसी कडून विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका(मल्टीमॉडल कॉरिडॉर) हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या १२६ कि.मी. लांबीच्या मल्टिमॉडल कॉरिडॉरमध्ये मेट्रो, महामार्ग तसेच सर्व्हीस रोड अशा सुविधा असणार आहेत. बहुउद्देशिय वाहतूक मार्गिकेत मुंबई, विरार, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल आणि उरण ईत्यादी भागाचा विकास करण्याचे उद्दीष्ट आहे. या मार्गिकेमुळे



नवीमुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी बंदर, एमटीएचएल आणि डीएफसी यांच्या जोडला जाणार आहे. या मार्गिकेतील नवघर ते चिरनेर हा पहिला टप्पा पुर्ण करण्यासाठी सध्या भूसंपादन आणि सर्वेक्षण प्रक्रीया सूरू करण्यात आली …/२

## बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प जलद गतीने पूर्ण करणार : ना.जितेंद्र आव्हाड

**दै.रायगड नगरी । मुंबई**


नायगाव येथील बीडीडी चाळ पाडल्यानंतर रिक्त जागी होणाऱ्या नव्या इमारतींच्या बांधकामामुळे नायगाव बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पातील पहिल्या टप्प्याला प्रारंभ होत आहे. बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प लवकरच जलद गतीने पूर्ण करून मार्गी लावला जाईल, असे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले.

मुंबईतील नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५ बी आज निष्कासित करून पाडण्याचे काम सुरु करण्यात आले. त्याठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ केला जाणार आहे. यावेळी गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश म्हसे, कार्यकारी अभियंता प्रशांत धात्रक आदी उपस्थित होते.



यावेळी प्रसार माध्यमांशी बोलतांना गृहनिर्माण मंत्री डॉ. आव्हाड म्हणाले की, …/२

## नागरिकांचे प्रबोधन करून कोविड लसीकरणास गती द्यावी : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड-१९ बाबत परिस्थिती गंभीर होत आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांचे प्रबोधन करून कोविड चाचण्या वाढवाव्यात व कोविड लसीकरण मोहीम अधिक गतीने राबवावी, अशा सूचना पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या.

जिल्ह्यातील कोविड-१९ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज ऑनलाईन बैठक संपन्न झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, तहसिलदार विशाल दौंडकर, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, आदि उपस्थित होते.

पालकमंत्री कु.तटकरे पुढे म्हणाल्या की, ज्या नागरिकांनी कोविड लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत त्यांना कोविड झाल्यानंतरही कोविडची सौम्य लक्षणे असल्याचे आढळले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व आरोग्य सुविधा अद्ययावत ठेवाव्यात व लसीकरण मोहिमेला गती देणे महत्वाचे आहे. लसीकरणाला गती देण्यासाठी इतर काही जिल्ह्यांप्रमाणे कोविड लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांनाच शासकीय कार्यालयात प्रवेश देण्यात येईल. अन्यथा त्यास प्रवेश नाकारला जाईल. तसेच लस न घेणाऱ्या नागरिकांचे प्रबोधन करून त्यांचे लसीकरण करून घ्यावे.

जिल्ह्यात अजूनही काही जणांनी कोविड लस घेतलेली नाही. त्यामुळे लस न घेतलेल्या नागरिकांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. नागरिकांनी कोविड अनुरूप वर्तनाचे पालन न केल्यास पोलिस प्रशासनाने दंडात्मक कारवाई करावी. त्याचप्रमाणे दि.१० जानेवारी २०२२ पासून फ्रंटलाईन वर्कर्स, हेल्थ केअर वर्कर्स यांना बुस्टर डोस देण्यास प्रारंभ करणार आहोत. त्याकरिता लवकरात लवकर बुस्टर डोससाठी नोंदणी सुरू करण्याची गरज आहे, असेही पालकमंत्री कु. आदिती तटकरे यावेळी म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, सध्याची जिल्ह्यातील करोनाची वाढती रूग्णसंख्या पाहता जर शाळा बंद करण्याची गरज भासली तर दि.३१ जानेवारी २०२२ पर्यंत १ ते ९ वीचे वर्ग बंद करण्याबाबत लवकरच निर्णय जाहीर करण्यात येईल. १५ ते १८ वयोगटातील मुला-मुलींचे कोविड लसीकरण सध्या सुरू असून शाळा बंद करण्याचा निर्णय झाल्यास त्यांचे लसीकरण शाळेतच करण्यात येईल. कोविड प्रतिबंधक लसीकरण मोहीम शंभर टक्के पूर्ण व्हावी, याकरिता लसीकरणाचा वेग वाढवावा. पूर्वतयारी म्हणून ऑक्सिजन व बेड्सची उपलब्धता ठेवावी.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर म्हणाले की, करोनाच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटची तीव्रता जास्त आहे. रायगड जिल्ह्यात मागील काही दिवसांत करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. विशेषत: पनवेल, उरण आणि खालापूर या भागातील परिस्थिती चिंताजनक आहे. करोनाच्या तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. तसेच उपचारांच्या सुविधांसोबतच …/२

# उपजिल्हा रुग्णालयात १५ ते १८ वयोगटातील मुलामुलींच्या लसीकरणास डॉ. इंगोलेंच्या हस्ते आरंभ

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

तालुक्यातील महत्वाचे उपजिल्हा रुग्णालय, कोव्हिड केंद्र पुन्हा एकदा कोरोनाचा सामना करण्यासाठी सज्ज ठेवण्यात येत आहे. सुदैवाने अजुन तरी एकही कोरोना रुग्ण रुग्णालयात दाखल नसुन, कालपर्यंतचा रॅपीड न्टीजन चाचणीचा रिपोर्ट निल आला आहे. गेला महिनाभरात दररोज जवळपास १० च्या सरासरीने कोरोना ण्टीजन चाचणी केली आहे. आजुबाजुच्या परिसरातील साई, गोरेगांव, मोर्बा येथे कोरोना रुग्ण असु शकतात असे बोलले जात आहे. अशातच सोमवार, दि. ३ जानेवारी पासून १५ ते १८ या वयोगटातील मुला-मुलींच्या कोव्हिड१९च्या कोव्हॅक्सिन लसीकरणास सुरूवात झाली असून रुग्णालयातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा पूर्णत: सज्ज असल्याचे रुग्णालय अधिक्षक डॉ. प्रदिप इंगोले यांनी सांगितले आहे.

तालुक्यातील १५ ते १८ वर्ष या वयो-गटातील मुला-मुलींनी लसीकरण मोहिमेस सकारात्मक प्रतिसाद देवून स्वत:बरोबर आपल्या कुटुंबाचेही करोना पासून संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे, असे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे आव-ाहन असुन आपण सर्वांनी लसिकरणाचा हा टप्पा देखिल यशस्वी करुयात. लसिकरणाच्या पहिल्या टप्प्यात जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालय (अलिबाग, चौक, जेएनपीटी/उरण, कर्जत, कशेळे, खोपोली, महाड, म्हसळा, माणगांव, मुरुड, पेण, पोलादपूर, रोहा, श्रीवर्धन) अशी १४ आरोग्य केंद्रे आणि महानगर पालिका क्षेत्रातील १० नागरी आरोग्य केंद्रे येथील लसीकरण केंद्रांवर ही लसीकरण सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

लसीकरणासाठी जिल्ह्यात १५ ते १८ या वयोगटातील मुलामुलींची अंदाजित संख्या १ लाख ४५ हजार ३८३ इतकी आहे. या सर्वांना को-व्हॅक्सिन लस देण्यात येणार आहे. लसीकरण केंद्रावर सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत लसीकरण करण्यात येणार असून यासाठी कोविन संकेतस्थळावर दि.१ जानेवारी २०२२ पासून नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी जवळील शासकीय आरोग्य केंद्रावरील वैद्यकीय अधिकार्यांशी संपर्क साधावा, असेही जिल्हा प्रशासनाने आवाहन केले आहे १५ ते १८ या वयोगटातील नवीन लाभार्थींसाठी काही महत्वाच्या सूचना पुढील प्रमाणे १) सन २००७ वा त्यापूर्वी जन्म वर्ष असलेले लाभार्थी हे पात्र राहतील. २) लाभार्थ्यांना कोविन सिस्टिमवर स्वतःच्या मोबाईल नंबरद्वारे लसीकरणासाठी नोंदणी करता येईल. ३) ही ऑनलाईन सुविधा दि.१ जानेवारी २०२२ पासून सुरु होईल. ४) लसीकरण केंद्राच्या ठिकाणी (प-ीळींश) जाऊन नोंदणी करण्याचीदेखील सुविधा उपलब्ध आहे.



# शासकीय अधिकारी, कर्मचारी वेळेत कार्यालयात उपस्थित नसल्याने ग्रामस्थांना माराव्या लागतात चकरा

## शिवसेनेने दिले मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील तलाठी, मंडळ अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात लावलेल्या नोटीस बोर्डाच्या वाराप्रमाणे आपल्या सजेवर उपस्थित राहत नसल्याने ग्रामस्थांना आपल्या कामांसाठी अनेक वेळा अनेक चकरा माराव्या लागतात. याबाबत शिवसेनेचे पनवेल तालुका संघटक भरत पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना निवेदन देवून सदर प्रश्नाबाबत लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात तलाठी, मंडळ अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात नियमित उपस्थित नसतात. त्यांच्या अनुपस्थितीबाबत चौकशी केली असता ते दुसर्‍या सजेवर हजर आहेत, असे सांगितले जाते. सदर सजेमध्ये चौकशी केली असता ते तेथेही उपस्थित नसल्याने ग्रामस्थांना त्यांच्या कामासाठी तहसील कार्यालय अथवा पंचायत समिती कार्यालयात अनेक चकरा मारुन अधिकार्‍यांची गाठ घ्यावी लागते. सामान्य लाभार्थी रेशनकार्ड धारकांना बायामेट्रीक थंब्स दिल्याशिवाय धान्य उपलब्ध होत नाही. परंतु सरकारी अधिकारी विना थंब्स मर्जीनुसार हजेरी लावून कार्यालयातून गायब होतात.

रायगड जिल्ह्यात महसूल व ग्रामविकास खात्याच्या कर्मचार्‍यांवर प्रशासकीय पकड राहिली नसल्याने या प्रश्नाबाबत भरत पाटील यांना मुख्यमंत्र्यांना निवेदन देवून त्यांचे लक्ष वेधले आहे.

# पत्रकार विठ्ठल ममताबादे कुलाबा जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२२ ने सन्मानित

**दै.रायगड नगरी । उरण**

भाई जगताप मित्र मंडळ रायगड व स्वर्गीय मधुकर ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या विद्यमाने दिनांक ३/१/२०२२ रोजी संध्याकाळी ६ वाजता सातिर्जे ग्रामपंचायत-तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, कला, क्रीडा, पत्रकारिता, पारंपारिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा कुलाबा जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२२ हा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पत्रकार विठ्ठल ममताबादे यांना कुलाबा जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२२ देऊन सन्मानित करण्यात आले.

सोमवार दिनांक ३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी सायंकाळी ६ वाजता अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय सातीर्जे येथे माजी आमदार स्वर्गीय मधुकर शंकर ठाकूर (पप्पा )यांचे नाव सातीर्जे ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहास देण्यात आला. या सभागृहाचे उदघाटन कामगार नेते भाई जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच त्यांच्या तस्वीरीचे अनावरण ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले. यानंतर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना कुलाबा जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२२ देऊन गौरविण्यात आले.



# पैशांच्या देवाण घेवाणीच्या वादातून एकाला केले जबर जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पैशांच्या देवाण घेवाणीच्या वादातून एकाला जबरी मारहाण करून जखमी केल्याची घटना तालुक्यातील पाले खुर्द गावातील एका चाळीत घडली आहे.

ओमप्रकाश बरनवाल उर्फ पतलुराम (वय-४५, रा.-पालेखुर्द) याला आरोपी मनोजकुमार व त्याच्या साथीदारांनी आपसात संगनमत करून पैशाच्या देवाण घेवाणीवरून ओमप्रकाश बरनवाल याला गंभीर मारहाणीची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत अधिक तपास सपोनि विनया पारासूर करीत आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नैना प्रकल्प शेतकर्‍यांवर जबरदस्तीने लादल्यास शेतकर्‍याचा आत्मदहनाचा इशारा

शेतकर्‍यांकडून बेटरमेंट चार्जेस वसुल करणार आहे. म्हणूनच ही नैना शेतकर्‍यांची दिशाभूल करत आहे. म्हणून ह्या प्रकल्पाला शेतकर्‍यांचा विरोध आहे. सुरुवातीला मुळ गावठाणापासून ४०० मिटर जागा गावाच्या विस्तारासाठी सोडणार होते, परंतु नैना यांनी मुळ गावठाणात आरक्षण टाकले आहे. तसेच स्वतःच्या उदर निर्वाहासाठी वडिलोपार्जित जागेत बांधलेली शेतघरे, गोठे, चाळी अनधिकृत ठरवून लाखो रुपये वसुल करण्यासाठी नैना वारंवार शेतकर्‍यांना व व्यवसायिकांना नोटीसा पाठवून त्यांचाकडून संमतीपत्र मागत आहे.

गेली आठ वर्षे या प्रकल्पाचा शेतकर्‍यांनी सखोल अभ्यास करुन नैना (सिडको) यांना वारंवार कायदेशीर पत्र व्यवहार करुन सुध्दा शेतकर्‍यांना विश्वासात न घेता हा प्रकल्प जबरदस्तीने लादत असल्याचा आरोप या उपोषणा दरम्यान करण्यात आला. त्यामुळे हा नैना (सिडको) प्रकल्प कायम स्वरुपी रद्द करण्यात यावा यासाठी एक दिवशीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. तरी हा प्रकल्प शेतकर्‍यांवर जबरदस्तीने लादल्यास आम्ही सर्व शेतकरी आत्मदहन करु असा ईशारा या दरम्यान देण्यात आला. या उपोषणाला नामदेवशेठ फडके, सुरेश ठाकूर, वामन शेळके, सुभाष भोपी, सुरेश पवार, राजेश केणी, अनिल ढवळे, नरेंद्र भोपी, नारायण पाटील, जगन फडके, सुदाम वाघमारे, बाळाराम फडके, डि के भोपी, बबन फडके, अनिल ढवळे, शेखर शेळके, सुरेश पाटील, रामचंद्र फुलोरे आदि उपस्थित होते.

## विरार अलिबाग बहूउद्देशिय मार्गाला जमिनी देण्यास उरणच्या शेतकर्‍यांचा विरोध

आहे. उरण तालुक्यातील बैलोंडाखार, दिघोडे, वेश्वी, जांभूळपाडा, गावठाण, जासई, भोम, चिखली भोम, चिरनेर, टाकीगाव, हरिश्चंद्र पिंपळे, नवापाडा, विंधणे, कळंबुसरे आणि कोळी बांधणखार या १६ महसूली गावातील जमिनी संपादित कराव्या लागणार आहेत. या प्रकल्पासाठी सर्वेक्षण आणि मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकार्‍यांना शेतकर्‍यांनी हुसकावून लावल्यानंतर शेतकर्‍यांना हा प्रकल्प समजावण्यासाठी उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके यांनी या बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीत शेतकर्‍यांनी विकासाला विरोध नसून आम्हाला आमच्या जमिनींचा योग्य मोबदला, प्रकल्पग्रस्त दाखले, येथे होणार्‍या मेट्रो स्टेशन तसेच इतर आस्थापनांमध्ये नोकर्‍या, सर्व्हीस रोड,गावातील पाण्याचा निचरा होण्यासाठीच्या उपाययोजना स्पष्ट केल्या शिवाय आम्ही या प्रकल्पाला जमिनी देणार नसल्याचे ठणकावले. यावेळी राहूल मुंडके यांनी शेतकर्‍यांना या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी लवकरच एमएसआरडीसी अधिकार्‍यांसमवेत एक प्रेझेंटेशन ठेवले जाईल.

तसचे जमीनीच्या मोबदला म्हणून रेडी रेकनरच्या चार पट पेक्षा अधिक मोबदला देण्यात येईल असे सांगितले. याबैठकीला उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, नायब तहसिलदार जी.बी. धुमाळ, नरेश पेडवी, पंचायत समिती उपसभापती शुभांगी पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील, संतोष पवार यांच्यासह बाधीत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागरिकांचे प्रबोधन करून कोविड लसीकरणास गती द्यावी : ना.आदिती तटकरे

प्रतिबंधात्मक उपाय योजनांवरदेखील भर देण्यात येत आहे. नागरिकांच्या कोविड लसीकरणाला वेग देण्यासाठीही जिल्हा प्रशासनामार्फत अथक प्रयत्न करण्यात येत आहे. जिल्ह्यातील करोनाची वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता, महाविद्यालयांची वसतिगृहे रिकामी करावीत, अशी विनंतीवजा मागणी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री श्री.उदय सामंत यांच्याकडे केलेली आहे. तसेच सर्व प्रमुख शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी-कर्मचारी व अभ्यागतांची रॅपिड अँटीजन चाचणी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. जिल्ह्यात कोविडच्या चाचण्या वाढविण्यात आल्या आहेत. तसेच सर्व संबंधित अधिकार्‍यांनी आपापल्या तालुक्यात नागरिकांना लस घेण्यासाठी आवाहन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गृह विलगीकरणात असलेल्या नागरिकांनी कोणत्याही परिस्थीतीत विलगीकरणाच्या नियमांचा भंग करू नयेत. तसेच काही भाजीपाला विक्रेते, दुकानदार हे ग्राहक असताना मास्कचा वापर करीत नाहीत, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यापुढे मास्क न वापरणाऱ्या संबंधित व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर म्हणाले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येत असलेल्या कोविड प्रतिबंधक उपाययोजनांची तर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे यांनी पोलीस विभागाकडून करण्यात येत असलेल्या कोविड प्रतिबंधक कारवाईबाबतची सविस्तर माहिती पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांना दिली.

बैठकीच्या सुरूवातीला पालकमंत्री महोदयांना तहसिलदार श्री.विशाल दौंडकर यांनी जिल्ह्यातील कोविड परिस्थितीची संगणकीय सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. तसेच प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्य क्षेत्रातील कोविड लसीकरण, कोविड-१९ बाबत प्रतिबंधक उपाययोजनांच्या तयारीबाबतचा आढावा सादर केला.

शेवटी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी नागरिकांना आवाहन केले की, नागरिकांनी घाबरून न जाता स्वतःची व आपल्या परिवाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. ज्या नागरिकांनी अद्याप कोविड लसीचा पहिला अथवा दुसरा डोस घेतलेला नाही त्यांनी त्वरीत डोस घ्यावा. मास्कचा वापर, सुरक्षित अंतर, हात धुणे या करोना त्रिसूत्रीचा अवलंब करून करोनाला रोखण्यासाठी कोविड अनुरूप वर्तनाचे काटेकोरपणे पालन करावे.

## बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प जलद गतीने पूर्ण करणार : ना.जितेंद्र आव्हाड

बीडीडी चाळींच्या प्रत्येक दगडाला इतिहास असून सामाजिक, सांस्कृतिक चळवळीची साक्ष देणाऱ्या या चाळी आहेत. सुमारे शंभर वर्ष जुन्या या चाळीतील इमारतींच्या पुनर्विकासाद्वारे येथील रहिवाशांना सर्व सुविधायुक्त मोठे घर देऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्याचे अनेक वर्षापासून पाहिलेले स्वप्न आज नायगाव बीडीडी चाळीतील चाळ क्रमांक ५ बी निष्कासित करून प्रत्यक्षात साकारत आहे. आशिया खंडातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या व राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे काम महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरु आहे. या प्रकल्पाकरिता शासनाने म्हाडाची 'सुकाणू अभिकरण' म्हणून नियुक्ती केली आहे, असेही डॉ.आव्हाड यांनी सांगितले.

नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये प्लॉट ब मधील २३ चाळींचा पुनर्विकास करण्यात येत असून उर्वरित प्लॉट अ मधील १९ चाळींचा पुनर्विकास दुसऱ्या टप्प्यामध्ये केला जाणार आहे. नायगाव बीडीडी चाळीतील पुनर्विकासाचा टप्पा क्रमांक १ अंतर्गत प्लॉट ब मधील २३ चाळींपैकी चाळ क्रमांक ५ बी, ८ बी व २२ बी मधील १७५ गाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालय विभागास सेवानिवासस्थान म्हणून देण्यात आले होते. या सेवानिवासस्थान गाळ्यांमधील रहिवाशांना नायगांव येथील बॉम्बे डाईंग या संक्रमण शिबिरामधील २२५ चौरस फूट चटई क्षेत्रफळाच्या गाळ्यांचा ताबा म्हाडातर्फे देण्यात आला आहे.


मा.मुजावर साहेब

प्रोसेस जमा रु.५०/- वकील : श्री.ए.टी.चौधरी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१९२४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०२/२०२२

१) श्री.अक्षय भगवान पाटील
वय : २५ वर्षे, धंदा : शेती / नोकरी
रा.मु.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

वरील अर्जदार यांची आई कै.कल्पना भगवान पाटील हे दि.१२/०६/१९९५ रोजी मु.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या हद्दीतील मु.पो.नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले. कै.कल्पना भगवान पाटील यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**सर्व्हे नं.३१, हिस्सा नं.१, क्षेत्र हे ०-आर ६७-७० प्रति, पो.ख.०-०७-१० प्रति, आकार रु.१३.५४ पैसे, सर्व्हे नं.२९, हिस्सा नं.७, क्षेत्र ०-५३-४०, पो.ख.०-०३-०, आकार १३.५४, सर्व्हे नं.३१, हिस्सा नं.०६, क्षेत्र ०-१५-०६, पो.ख.०-०१-५०, आकार २.६४ मौजे बुर्दल, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथे आहे.**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील अर्जदाराच्या वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांना दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/१२/०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.गोडसे मॅडम

ॲड.सुजाता पाटील

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज १९२१/२०२१
ने.ता.१४/२/२०२२

श्री.सुनील पुंडलिक जाधव व एक अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार नं.२ यांची आई व मयत कै.श्रीमती.विजया सुनील जाधव यांचे दि.२३/३/२०२० रोजी खारघर येथे निधन झाले. कै.श्रीमती.विजया सुनील जाधव यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्ता परिशिष्ट**
**सदनिका नं.एच ९/६, २१, इमारतीचे नाव पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित, ब्लॉक नं. स्पॅगेटी, सेक्टर १५, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०**
**क्षेत्रफळ : ४७.९६ चौ.मी. व ५१६.०५० चौ.फूट**
**ॲग्रीमेंट मालमत्ता मुल्यांकन : २५,००,०००/-**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रांसहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.गोडसे सो

ॲड.लक्ष्मी मा. काळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३३२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०१/२०२२

श्री.नितीन नामदेव बलिद
रा.रुम नं.९५, राहूल नगर, वाशी नाका,
आर.सी.मार्ग, चेंबुर, मुंबई-७४
विरुद्ध
१) सौ.संगीता बाळू थोरात
रा.रुम नं.९०, राहूल नगर, वाशी नाका,
आर.सी.मार्ग, चेंबुर, मुंबई-७४
२) सौ.चित्रा अनिल खरात
रा.रुम नं.३०१, राहूल नगर, वाशी नाका
आर.सी.मार्ग, चेंबुर, मुंबई-७४

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.श्रीमती. आशा नामदेव बलिद यांचे निधन दि.११/११/२०१५ रोजी मुंबई येथे झालेले असून श्री.नितीन नामदेव बलिद यांनी कै.श्रीमती.आशा नामदेव बलिद यांच्या खालील वर्णनाची मिळकत वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. (फक्त ५०% हिश्श्यासाठी)

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.१०१, १ ला मजला, ''प्रयास'' प्लॉट नं.०९, सेक्टर ०७, नवीन पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड.**
**क्षेत्रफळ ५१.६८ चौ.मी., बिल्टअप ऑफ कारपेट क्षेत्रासोबत टेरेस ४३.१२ चौ.मी. ऑफ कारपेट ऑफ पार्कींग क्षेत्र,**
**करारनाम्याचे किमान मुल्य रु.५,००,०००/-**
**(अक्षरी रु.पाच लाख मात्र) केवळ ५०% हिस्सा**

वरील मिळकत ही कै.श्रीमती.आशा नामदेव बलिद यांच्या स्वकष्टाची असून श्री.नितीन नामदेव बलिद यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाही तर हे मे.कोर्ट यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.श्रीमती.आशा नामदेव बलिद यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, दि.३१/१२/२०२१ रोजी दैनिक वादळवारा या वृत्तपत्रात खालील वर्णनाची मिळकतीच्या खरेदी संदर्भात ॲड.धिरज लहू डाकी, रा.बोरखार, ता.उरण, जि.रायगड यांनी त्यांचे त्रयस्थ अशिल यांच्या वतीने सदरहू मिळकतीचे मालक श्रीमती.आशाबाई वसंत कडू व इतर यांनी मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकती संदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| विंधणे | १५७ | १ ब | ०-९७-७० | २.९४ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

या वरील मिळकती संबंधी तुमचे त्रयस्थ अशिल यांच्यामार्फत तुम्ही आमचे अशिलांची सही न घेता तथाकथित श्रीमती.आशाबाई वसंत कडू व इतर असे जाहीर नोटीसमध्ये दाखवून विक्री व्यवहारासंबंधी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. सदर वरील मिळकत सर्व्हे नं.१५७/१ ब या मिळकतीचा श्रीमती.आशाबाई वसंत कडू व आमचे अशिल १) श्रीमती.शशिकला विजय घरत, २) कु.स्नेहल विजय घरत, ३) कुमार सुधर्म विजय घरत यांच्यामध्ये सरस निरस वाटप झाले नसून सदरहू मिळकती या एकत्रित हिंदू कुटुंबांच्या वडिलोपार्जित मिळकती असून आमचे अशिलांच्या सदरहू मिळकतीत जन्मजात अविभाज्य हिस्सा व हक्क आाहे. त्यामुळे सदरहू मिळकतीचा आमचे अशिलांच्या संमतीशिवाय व अपरोक्ष सदरहू मिळकतीचा व्यवहार करणे बेकायदेशीर आहे. तसेच सदरहू मिळकतीचा आकारफोड व सातबाारा प्रमाणे हिस्सेवारी झालेली नसल्याने दि.३१/१२/२०२१ रोजी दैनिक वादळवारा या वृत्तपत्रात पाठविलेली ॲड.धिरज लहू डाकी यांनी पाठविलेल्या नोटीसीस आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तरीही सदर मिळकतीचा कुठल्याही प्रकारचा व्यवहार, विक्री, दान, बक्षिस, गहाण, फरोक्त खत, विकासाचा करार कुणीही केल्यास सदरचा कोणताही व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच तुमचे त्रयस्थ अशिलांनी व्यवहार केल्यास त्यास सर्वस्वी परिणामांस जबाबदार तुमचेच अशिल राहतील. त्याचप्रमाणे तुम्ही वरील मिळकती संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास आमचे अशिल तुमच्या विरुद्ध दिवाणी व फौजदारी कारवाई करतील. तसेच तुम्ही आमचे अशिलांची सही न घेता आमचे अशिलांच्या मिळकतीची तथाकथित जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यामुळे तुमच्यावर देखील कारवाई करण्याचे हक्क आमचे अशिल राखून ठेवत आहेत, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुमित अविनाश म्हात्रे**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरा समोर, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८९२१३२६७३**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या लसीकरणाला मुरुडमध्ये अल्प प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । मुरुड**

कोरोनाच्या रुग्णवाढीचा वाढता वेग पाहता मुरुडमधील आरोग्य विभाग व नगरपरिषद प्रशासनाने यावर मात करण्यासाठी कंबर कसली आहे. यामध्येच मुरुडमध्ये बऱ्याच दिवसानंतर दोन कोरोना रुग्ण पॉझिटिव्ह मिळाल्याने खळबळ माजली आहे.

मुंबई पुणे वगळता सर्व ठिकाणी शाळा सुरळीत सुरु असून मुलांना आरोग्य कवच म्हणून १५ते १८ वयोगटातील मुलांसाठी मुरुड शहरातील लेडी फातिमा कुलसुम बेगम हॉस्पिटलमध्ये लसीकरण केंद्रात ३ जानेवारी पासून लसीकरण सुरू केले असून दररोज ऑनलाइन पध्दतीने ५० व ऑफलाईन पद्धतीने १०० लस देण्याची सोय उपलब्ध करण्यात आली असून पहिल्या दिवशी शहरात फक्त १० मुलांनी व दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत १७ मुलांचे लसीकरण झाल्याचे आढळले.

कोरोनावर मात करण्यासाठी मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी आपल्या टीमसह बाजारपेठेत फिरून व्यापारी वर्गाला व नागरिकांना मास्क, सॅनिटायझर, सुरक्षित अंतर याबाबतचे नियम काटेकोरपणे आमलात आणण्याचे आवाहन केले. तसेच यापुढे दोषी आढळल्यास कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच शहरातील शाळांमध्ये भेट देऊन मास्क, सॅनिटायझरचा योग्य वापर होत असल्याचे तपासून पाहिले व ९ वी व १० वी १२ वी च्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाचा प्रतीसाद पाहता जनजागृती करण्याची आवश्यकता असून शाळांमध्ये लसीकरण कॅम्प उभारण्यात यावे अशी मागणी समाजसेवक कीर्ती शाह व इतर नागरिकांनी केली आहे.



# नवसाला पावणारी कोलीवलीच्या सटूआईची यात्रा कोरोनाच्या छायेत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील प्रामुख्याने आगरी–कोळी लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या कर्जत तालुक्यातील सटूआईची यात्रा भरलीच नाही.कोरोनाचा संसर्ग वाढत असल्याने ग्रामस्थांनी यात्रेतील बाजारपेठ आणि बाहेरच्या लोकांना नवस फेडायला येण्यास बंदी घातली आहे.किरकोळ वर्दळ वगळता ग्रामस्थ आणि पोलिसांच्या आवाहनानंतर कोलीवली येथे यात्रा भरलीच नाही.

दरवर्षाप्रमाणे कोलिवली येथील सटूआई ही नवसाला पावणारी देवी म्हणून ओळखली जाते. मार्गशीर्ष अमावस्याला या देवीची यात्रा भरते आणि पुढील १५ दिवस देवीचे नवस फेडायला रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील भक्त बहुसंख्येने येत असतात.बाळाचा जन्म होताना सटूआई बाळाच्या पाचवीला येऊन त्याचे भविष्य रेखाटत असते अशी आख्यायिका असून आपल्या बालकाचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी देवीला केलेले नवस फेडण्यासाठी यात्रा भरते. कर्जत तालुक्यातील नेरळ–कशेळे रस्त्यावर कोलीवली गावामध्ये या देवीचे मंदिर असून देवी एका खासगी घरात वास्तव्यास असून त्याच



ठिकाणी यात्रेत ग्रामस्थ मंडळ देवीच्या दर्शनाचे नियोजन करीत असतात.तर अमावस्येला देवीची पालखी मिरवणूक असते.रविवार २ जानेवारी रोजी कर्जत विधानसभा मतदारसंघ चे आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत यात्रा निघाली. गावातील सर्व ग्रामस्थ यांनी मिळून पालखी पालखीची मिरवणूक मोठ्या उत्साहात काढली होती.

सटूआई चा नवस फेडण्यासाठी दरवर्षी भरणारी यात्रा मागील वर्षांप्रमाणे कोरोना मुळे आलेले निर्बंध लक्षात घेऊन यात्रेला सटूआई यात्रेवर संकट आले आहे. यावर्षी केवळ स्थानिक लोकांना नवस फेडण्यास येण्यासाठी परवानगी देण्यात आली असून नेरळ पोलीस आणि वाकस ग्रामपंचायत यांनी मास्क चा वापर यात्रेला येणाऱ्या सर्वांसाठी बंधनकारक केला आहे.आजूबाजूचे गावातील मंडळी शेजारच्या तालुक्यातून येणारी गर्दी पाहून यावेळेस गर्दी टाळण्यासाठी गावकरी आणि पोलीस प्रशासन कोरोना महामारी निर्बंध असल्याने यात्रेमधील गर्दी आटोक्यात आणण्यासाठी नियमांचे बंधन पोलीस प्रशासन आपली भूमिका बजवत असताना दुकानदार खेळणे वाले येणारे भाविक यांच्या तोंडाला मास्क न लावल्यास दंड आकारला जाईल अशी पोलिसांकडून चेतावणी दिली जात आहे. दरवर्षी ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील भक्तांची नेहमीची गर्दी लक्षात घेऊन नेरळ पोलिसांनी मोठा बंदोबस्त सज्ज ठेवला आहे.पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, उपनिरीक्षक भालचिम, गावडे, महिला पोलीस उपनिरीक्षक मुळीक, वाजदे आणि पोलीस कर्मचारी तैनात आहेत.

परिसरातील बहुतेक प्रत्येक गावातील लोकांची नवस फेडण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन ग्रामस्थांनी मंदिरात येताना केवळ तीन लोकांनी यावे असे बंधनकारक केले आहे. देवीची ओटी भरून पूजा–अर्चना केली जाते देवीला कोंबडा– बकऱ्याचा मान दिला जातो. अशा वेळी आपल्या कुटुंबासहित मित्रमंडळी अजून बोलून झाडाच्या खाली कुठे पटांगणात, शेतात अशा ठिकाणी जेवण करतात. त्यामुळे नेहमी या ठिकाणी हजारो लोकांची गर्दी कोलीवली, नेवाळी, वाकस, चोरावले गावाच्या हद्दीत भक्त झाडांच्या आडोशाला चुलीवरचे जेवण बनवले जात असल्याचे दिसून येत असते.यावर्षी बाहेरून कोणालाही प्रवेश दिला जात नसल्याने गर्दी तुरळक आहे.

तरी देखील काही दुकाने गावाच्या बाहेर लागली आहेत. मात्र कोरोनाच्या छायेत यावर्षी देखील सटीआई ची यात्रा भरली नाही.मात्र आगामी १५ दिवस भक्त आपल्या कुटुंबाला घेऊन येऊ शकतात, परंतु कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करावे लागणार आहेत. मात्र त्यावेळी देखील मंदिरात मास्क लावून जावे लागणार असून गर्दी करू नये असे आवाहन वाकस ग्रामपंचायतच्या सरपंच सुदर्शना संजय तांबोळी यांनी आवाहन केले आहे.

# रायगड जिल्हा परिषद कृष्णनगर शाळेचा सुवर्ण महोत्सव संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१९७१ साली स्थापन झालेल्या रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कृष्णनगर शाळेला नुकताच ५० वर्ष पूर्ण झाली. या निमित्त कृष्णनगर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने शाळेचा सुवर्ण महोत्सव साजरा विविध कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. या वेळी ग्रंथ दिंडी, सर्व माजी शिक्षकांचा सत्कार,चित्रकला स्पर्धा व काव्य सादरकीरण स्पर्धा आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुधीर पवार यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न झालेल्या सत्कार समारंभात १५ हून अधिक माजी शिक्षक व हयात नसणा–या शिक्षकांच्या कुटुंबीयाचा सन्मान करण्यात आला. या वेळी हा सन्मान स्विकारताना जो समाज चांगल्या विचाराने झपाटलेला असतो तोच समाज शाळेचा सुवर्ण महोत्सव साजरा करतो असे मत माजी शिक्षक मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी व्यक्त केले. हे मत मांडताना शाळा हे गावाचे वैभव आहे. आणि हे वैभव टिकवण्यासाठी ग्रामस्थांनी शाळेचा पट टिकवून ठेवावा असे अवाहन देखील केले. यावेळी इंडिया झिंदाबाद फ्रेण्ड्स गृप (आय.झेड.मंडळ) रायगड चे अध्यक्ष रमेश थवई यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सदर कार्यक्रमास खामगाव गृप ग्रामपंचायत सरपंच प्रियांका निंबरे, उपसरपंच एकनाथ खामगावकर, ग्रामविकास अधिकारी निलिमा सुतार, प्रकाश टेंभे इंडिया झिंदाबाद फ्रेण्ड्स गृपचे सदस्य महेंद्र पाटील, शंकर काथारा संजय पाटील, नरेश पाटील, रवि पाटील, सूर्यभान शिरसाठ, मंदाकिनी पाटील, आरती मनवे ,प्रकाश टेंबे,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन.शैलेश खेरटकर यांनी केले. सदर कार्यक्रमास यशस्वी होण्यासाठी रविंद्र वाडकर, दर्शन पारावे, मधुकर पारावे, संग्राम पवार, परेश पोष्टुरे यांच्यासह कृष्णनगर ग्रामस्थ मंडळाने मेहनत केली.



# बहुजन हितकारिणी सभेच्या वतीने सावित्रीमाई फुले जयंती निमित्त दिनदर्शिका वाटप

**दै.रायगड नगरी । माणगाव**

भारत देशातील थोर समाज सेविका व विद्येच्या प्रणेत्या भारतातील पहिल्या शिक्षिका ज्ञान ज्योती माता सावित्रीबाई फुले यांची सोमवार दि ३ जानेवारी जयंती बहुजन हितकारिणी सभेच्या वतीने माणगांव येथे करण्यात आली.

तसेच यावेळी बहुजन हितकारणी सभेच्या वतीने जयंतीचे अवचित्य साधून दिनदर्शिकाचे माणगांव तालुक्यात वाटप देखील करण्यात आले.

यावेळी या ठिकाणी बहुजन हितकारणी सभेचे महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष रवींद्र जाधव, या कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड.परेश जाधव, कार्यअध्यक्ष किशोर स.शिर्के, संजय निजापकर, संतोष मोरे, भिमराव मोरे, वसंत जाधव, रामभाऊ लोणके, अमोल कांबळे, मंगेश पवार, अँड.पी.टी.मालोरे कायदेशीर सल्लागार हे उपस्थित होते. तसेच यावेळी ज्ञान जोती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर उपस्थित मान्यवरांनी प्रबोधन केले.



# रा. जि. प. शाळा खरसई येथे सावित्रीबाई फुले यांना विनम्र अभिवादन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त रा. जि. प.आदर्श शाळा खरसई येथे ज्ञानोत्सव २०२२ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यामध्ये शाळेमध्ये सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

MVSTF च्या माध्यमातून आदर्श शाळा उपक्रमांतर्गत मान्यवरांच्या हस्ते शाळेला क्रीडा साहित्य व कॉम्प्युटर चे वाटप करण्यात आले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील नाटिका सादर करण्यात आली. तहसीलदार समीर घारे यांनी विध्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले व विध्यार्थ्यांचे व शाळेचे अभिनंदन केले.

पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांबद्दल आनंद व्यक्त केला. MVSTF जिल्हा समन्वयक रत्नशेखर गजभिये यांनी शाळेला मिनी लॅब व इतर मदत देण्याचे व विविध उपक्रमांची माहिती घेऊन अभिनंदन केले.गटशिक्षणाधिकारी राजेश कदम साहेब यांनी विध्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाबद्दल मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर मान्यवरांच्या हस्ते रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध क्रीडा स्पर्धा यांचे पारितोषिक वितरण करण्यात आले. शाळेत आनंददायी शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन सानप सर यांनी केले.

# तळा नगरपंचायतीमध्ये १८ उमेदवार वैध ; ८ उमेदवार अवैध

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणुकीत चार जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत२६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते त्या उमेदवारीअर्जांची छाननी ४जानेवारी रोजी झालीत्यात १८ उमेदवार वैध ठरले असून ८ उमेदवार अवैध ठरले आहेत. अशी माहिती निवडणूकीचे निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी दिली.

एकूण १८उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत प्रभाग क्रमांक १ मध्ये १) बामणे ग्रिष्मा गणेश – राष्ट्रवादी २)मांडवकर शुभांगी हिरू – शिवसेना ३) टिळक अमृता विराज – भाजपा प्रभाग क्रमांक ३ मध्ये १)मेहत्तर यामिनी जनार्दन – राष्ट्रवादी २) तळेकर विद्या विलास – शिवसेना ३) तळेकर रोशनी निलेश – शेकाप ४) ठसाळ वैभवी विलास – भाजपा प्रभाग क्रमांक १० मध्ये १) शिगवण मंगेश रामचंद्र – राष्ट्रवादी २) फोंडळ प्रविण भागोजी – शिवसेना ३) वेदक संस्कृती हर्षद – शेकाप ४) वेदक किशोर गणेश – भाजपा प्रभाग क्रमांक १४ मध्ये १) मुंढे रितेश रविंद्र – अपक्ष २) मुंढे रेश्मा रविंद्र – अपक्ष ३) मोरे देवयानी समीर – राष्ट्रवादी ४) मुंढे लता जनार्दन – अपक्ष ५) शिर्के योगेश वामन – शिवसेना ५) रहाटविलकर तब्बसुम म स –अपक्ष ६) कुरुक्कर जमालुद्दीन अब्दुल्ला–अपक्ष या उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून आठ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. १८ उमेदवारांमध्ये राष्ट्रवादी, शिवसेना,भाजपा, शेकाप,अपक्ष यांच्यात लढती होणार असून बहूमतासाठी चढाओढ करावी लागणार आहे. अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी कोणकोण निवडणूक रिंगणात उभे राहणार आहे हे समजेल राजकीय हालचालींना जोरदार सुरुवात झाली आहे. अंतर्गत प्रचार सुरू आहे.ही निवडणूक चार प्रभागात लढविताना सर्वच पक्षांना येथे ताकदलावावी लागणार आहे.संपुर्णतळावासीयांचे या चार लढतीकडे लक्ष लागून राहिले आहे.

---

मा.गोडसे मॅडम

अॅड.प्रमिला ठाकूर / पाटील

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश सो. यांच्या कोर्टा समोर

सि.एम.ऐ.नं.१९४५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/२/२०२२

राजेश शामसुंदर कोरगांवकर वगैरे १
शीतल विनायक गुजर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ चे वडील कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर हे दि.१/३/२०२१ रोजी मयत झाले असून आई कै.जयमाला शामसुंदर कोरगांवकर या दि.२५/८/२००९ रोजी मयत झाले आहेत. त्यांचा दाखला अर्जासोबत जोडला आहे.

कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर यांच्या मृत्यूनंतर यांच्या नावांने खालील मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, ऐ विंग, महाविर टॉवर, प्लॉट नं.९१, मौजे : उलवे, बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकती**

**२) मौजे : बोरभाटी, ता.कुडाळ, स.नं./गट नं.५/९, सिंधुदूर्ग**

सदरील वारस दाखला मधील मिळकती संदर्भात अन्य कोणाच्या नावाने मृत्यूपत्रानं, खरेदीखताने, हक्कसोडपत्राने, बक्षिसपत्राने, गहाण अथवा इतर कोणत्र्हाही वारसांची कसलीही हरकत असल्यास सदरील जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत मे.पनवेल कोर्टात हरकत नोंदवावी.

वरील मुदतीमध्ये ३० दिवसांत हरकत आली नाही तर सदरील मिळकतींना अर्जदार राजेश शामसुंदर कोरगांवकर व शीतल विनायक गुजर हे कै.शामसुंदर दत्ताराम कोरगांवकर, आाई कै.जयमाला शामसुंदर कोरगांवकर यांच्या निधनानंतर कायदेशीर वारस आहेत असे वारस दाखला त्यांना देण्यात येईल. तसेच मागावून येणाऱ्या हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.०३/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम

अॅड.प्रमिला ठाकूर / पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. यांचे कोर्टात

एम.ए.नं.१९८१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१७/२/२०२२

१) मनिबाई सोमा ढेबे
लग्नानंतर अधिचे नांव मनिबाई गंगा बावधाने उर्फ धनगर
रा.सारसई, आपटा, पनवेल, जि.रायगड
२) भागीबाई गंगा बावधाने उर्फ धनगर
लग्नानंतर नांव भागाबाई कानु घाटे–मयत
१/१) कोंडू कानु घाटे
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
१/२) धोंडू कानु घाटे
वय : ६७ वर्षे, धंदा : शेती
दोघे १/१ व १/२ रा.खडई, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मनिबाई गंगा बावधाने उर्फ धनगर लग्नानंतरचे नांव मनिबाई सोमा ढेबे रा.सारसई आपटा, पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी असून त्यांचे वडील कै.गगा जानू बावधाने उर्फ धनगर हे दि.४/६/१९३६ रोजी तर आई कै. साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर या दि.२४/०४/१९४५ रोजी मौजे येथे त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने मयत झाले आहेत. तसेच त्यांची मुलगी कै.भागीबाई कानु घाटे या देखील दि.१४/०८/२००५ रोजी मौजे : खडई, खालापूर येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार कोंडू कानु घाटे व धोंडू कानु घाटे हे भाचे आहेत. अर्जदार यांनी मयत कै.गंगा जानु बावधाने उर्फ धनगर व कै.साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर यांचे कायदेशीर वारस आहेत. यासाठी सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्यांच्या नांवे मौजे : घेरकिल्ला माणिकगड, स्थानिक नांव : खैरपाटी ग.क्र.३०, क्षेत्र १६.३९.००, पो.ख. १.८६.००, एकूण १८.२५.००, आकारणी ३८.०० होती ती सरकारी दप्तरी जमा झालेली आहे. तिला वारसांची नोंद होण्यासाठी तसेच सदरील मिळकती संदर्भात तहसील पनवेल, उपविभागीय अधिकारी पनवेल येथे कामकाज चालविण्यासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी मयत कै.गंगा जानु बावधाने उर्फ धनगर हे दि.४/६/१९३६ रोजी तर आई कै.साईबाई गंगा बावधाने उर्फ धनगर ही दि.२४/०४/१९४५ रोजी यांच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत. याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदरील वारसा संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात मे.पनवेल कोर्टात येवून कळवावे. तसे नाही कळवले तर मागून येणाऱ्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

सदरील अर्जाची पेपर नोटीस ३ माहे जानेवारी सन २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यास दिली आहे.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

अर्जदारतर्फे वकील
अॅड.प्रितम शा. वासकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज १४५२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/२/२०२२

कै.लक्ष्मण काथोर पाटील (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.किशोर लक्ष्मण पाटील
वय : ४४ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.नरेश लक्ष्मण पाटील
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.शिवाजी लक्ष्मण पाटल
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती
वरील सर्व रा.भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
५) नंदा लक्ष्मण पाटील (पुर्वाश्रमीची)
सौ.नंदा सुरेश मुंडे
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
रा.गावदेवी पाडा, मुंडे चाळ, व्ही.के.हायस्कूल जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. लक्ष्मण काथोर पाटील हे दि.५/१०/२०२० रोजी मौजे : भंगारपाडा, ता.पनवेल येथे मयत झालेले असून श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे हे त्यांचे खाली वर्णन केलेल्या मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत.

कै.लक्ष्मण काथोर पाटील ह्यांचे हिश्श्यास आलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन

**मौजे : मानघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मानघर | ५५ | – | ०–२८–१० पो.ख. ०–०३–८० | ५.७५ |

श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे हे कै.लक्ष्मण काथोर पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्रीमती.उर्मिला लक्ष्मण पाटील... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल व ते जर कै.लक्ष्मण काथोर पाटील यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०३/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब ह्यांचे न्यायालयात

वारसांचे सर्टीफिकेट बद्दल जाहीरनामा — दिवाणी अं.१५० रा
Civ. A 150 m
अॅड.सुनिता प्रभू
अॅड.दर्पण पाटील

प्रोसेस जमा रु.५०/– — अर्जदार यांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात पनवेल

दि.चौ.अर्ज १९६३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/२/२०२२

१) श्री.मच्छिंद्र तुकाराम भोईर
वय : ६० वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.दिलीप तुकाराम भोईर
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.वत्सला चंद्रकांत पाटील
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मु.पतनोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.सरिता पांडुरंग पाटील
वय : ४० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मु.सांडगे, पो.आजिवली, हनुमान मंदिर जवळ,
ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.अनिता राजू सुर्यवंशी
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.पो.चिरनेर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे वडील कै.तुकाराम गोमा भोईर यांचे दि.१३/११/२०२१ रोजी कुंडेवहाळ येथे निधन झाले. मयत कै.तुकाराम गोमा भोईर यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**परिशिष्ट अ**

| क्रं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ | ७९ | ३ | ०–०३–८० |
| २) | कुंडेवहाळ | ४७ | १ | ०–४४–९० |

**परिशिष्ट ब**

| क्रं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १) | कुंडेवहाळ | ९ | १ | ०–१८–० |
| पैकी कै.तुकाराम गोमा भोईर यांचे हिश्श्याचे मिळकतीबाबत | | | | |

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०१/२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मित्राला धमकावणाऱ्या इसमास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका तरूणीचा पाठलाग करून तिच्याकडे एकटक पाहून स्वतःच्या मोबाईलमध्ये तिचे व्हिडीओ शुटींग केल्याने याबाबतची विचारणा सदर तरूणीच्या मित्राने केल्यावर त्याला शिवीगाळ करून धमकावणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. आझान राठोड (वय–२२) हे या तरूणाचे नाव असून त्याने लाईफलाईन हॉस्पिटलसमोर एका तरूणीचा पाठलाग करून तिच्याकडे एकटक पाहून स्वतःच्या मोबाईलमध्ये तिचे व्हिडीओ शुटींग केल्याने याबाबतची विचारणा सदर तरूणीच्या मित्राने केल्यावर त्याला शिवीगाळ करून धमकावल्याबद्दलची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करताच म सपोनि मोनाली चौधरी यांनी सदर तरूणाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## निलेश महाडीक यांना छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील पुई गावचे सुपुत्र समाजसेवक निलेश भाई महाडीक यांना जिजाऊ बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नागमठाण ता, वैजापूर जि, औरंगबाद येथुन १जानेवारी २०२२रोजी आदर्श समाजसेवक छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिक्षक कैलास प्रजापती साहेब, संजय निकम माजी सभापती वैजापूर,मुंबई येथील समाजसेविका श्रमिका दळवी, व आयोजक सुर्यकांत पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व दीपप्रज्वलन करून तसेच मशाल पेटवुन करण्यात आली.तसेच या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली. कु. निलेश भाई महाडीक यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अतिशय महत्वाची भूमिका बजावली असून त्यांनी केलेल्या कौतुकास्पद कामगिरीची दख्खल घेऊन जिजाऊ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नागमठाण यांच्या तर्फे छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार देण्यात आला.

या पुरस्काराबद्दल माजी आमदार अवधूतदादा तटकरे, युवा नेते संदिप शेठ तटकरे,पत्रकार मित्र, त्यांचे सहकारी प्रसाद खुळे, ड रेवती ताई तटकरे, संजय कणघरे, गौरव नाईक, ईकिंदर शेवाले, निलेश पवार, संदिप कणघरे, रोहीत पवार,आदिनी निलेश भाई महाडिक यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तरुणांनी लसीकरण मोहीम यशस्वी करावी : सचिन गोसावी

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – आपण सर्वांनी गेल्या दीड वर्षांपासून कोरोना विषाणूचा अतिशय सक्षम पणे सामना केला आहे. ओमीक्रोन व कोरोना या दोन्ही विषाणूच्या संसर्गाला आळा घालण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरुण वर्गासाठी सुरु करण्यात आलेल्या लसीकरण मोहिमेला यशस्वी करणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. तरुणांनी लसीकरण मोहीम यशस्वी करावी असे प्रतिपादन श्रीवर्धनची तहसीलदार सचिन गोसावी यांनी केले आहे.



उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथे सोमवारी वय वर्ष १५ ते १८ या वयोगटातील तरुणांच्या लसीकरणाला सुरुवात करण्यात आली. तहसीलदार सचिन गोसावी, गट विकास अधिकारी, उद्धव होळकर, नगरपालिका मुख्याधिकारी विराज लबडे डॉक्टर अमृता श्रीवर्धनकर यांच्या उपस्थितीमध्ये लसीकरण मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. सचिन गोसावी यांनी श्रीवर्धन तालुक्यातील तरुणाईला लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले आहे.

गोसावी म्हणाले श्रीवर्धन तालुक्यात १५ ते १८ वयोगटातील अंदाजे २६१० च्या जवळपास तरुण आहेत. आपणा सर्वांना पुन्हा एकदा कोरोना चा सक्षम पणे सामना करायचा आहे. राज्यभरात कोरोना रुग्णांची वाढणारी संख्या आपल्या सर्वांसाठी त्रासदायक ठरू शकते. अशा प्रसंगी आपण योग्य काळजी घेणे अगत्याचे आहे. आपल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून मास्क लावणे, सोशल डिस्टन्स गरजेचे आहे. रायगड जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार प्रशासकीय यंत्रणा सर्वशक्तीनिशी कोरोना विरुद्धच्या लढाईमध्ये अग्रणी आहे. जनतेच्या सहकार्यातून आपण निश्चितच कोरोना वर विजय संपादन करू याची मला खात्री आहे. प्रत्येकाने आप आपले कर्तव्य पार पाडून कोरोनाला नष्ट करू या असे तहसीलदार सचिन गोसावी यांनी सांगितले आहे.

श्रीवर्धन शहरातील र. ना.राऊत महाविद्यालयामध्ये मंगळवार पर्यंत ७० विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले आहे. बुधवारी एका दिवसामध्ये किमान १०० विद्यार्थ्यांना लस देण्याचा प्रयत्न आहे असे महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र ढाकणे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी लसीकरणासाठी पात्र आहेत.

# अपक्ष उमेदवार संजय घोसाळकर अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

पाली नगर पंचायतीच्या उर्वरित चार जागांची निवडणूक आता चुरशीची होऊ लागली आहे. प्रभाग नंबर ८ मधून पाली मधील सामाजिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेले समाजसेवक संजय दत्तात्रय घोसाळकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मतदारांनी व नागरिकांनी केलेल्या लोक आग्रहास्त्व अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढवीत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांना समाजातील नागरिकांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे.



पाली नगरपंचायतीचे उर्वरित चार जागांची निवडणूक १८ जानेवारीला होत आहे . प्रभाग क्रमांक ८ मधून पालीतील समाजसेवें मध्ये नेहमी अग्रेसर असलेले संजय उर्फ आप्पा घोसाळकर यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज तहसील कार्यालयात दाखल केला आहे. त्यावेळी त्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी त्यांचे कुटुंबीय व पालीतील नागरिक उपस्थित होते. संजय घोसाळकर हे पाली ग्रामपंचायतीचे माजी सदस्य म्हणूनही त्यांनी चांगली कामगिरी केलेली आहे. पालीतील विविध नागरी समस्यांना शासन स्तरावर वाचा फोडून त्या शासकिय अधिकारी यांचेशी समन्वय साधून सोडवण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न असतो. पालीतील नागरिकांनी आग्रह केल्यानुसार त्यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून पाली नगरपंचायतीच्या निवडणुकीत चुरस निर्माण केली आहे.२४ तास सामाजिक ध्यास चा नारा घेऊन ते गेल्या अनेक वर्षापासून पालीतील समाज जी–वनात काम करीत आहेत. नागरिकांच्या अडीअडचणीला तत्परतेने रात्री बेरात्री केव्हाही हाकेला साद देऊन त्यांना मदत करण्यात ते नेहमी अग्रेसर असतात. त्यामुळे त्यांनी पालीतील समाज जी–वनावर वेगळा ठसा निर्माण केला आहे. त्यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जा मुळे प्रभाग क्रमांक ८ मध्ये चांगलीच चुरस निर्माण होणार आहे.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या टप्प्यात लढत ‘तिरंगी’च

## शिवसेना, काँग्रेस आघाडी अन् भाजप रिंगणात

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या टप्प्यातील चार प्रभागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर छाननीनंतर शिवसेना आणि काँग्रेस या राजकीय प्रतिस्पर्धी पक्षांसोबतच भारतीय जनता पक्षाने एकूण १७ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्ज छाननीनंतर वैध उमेदवारी अर्जांची संख्या १२ असून अवैध ठरलेल्या पाच उमेदवारी अर्जामुळे तिरंगी लढत अटळ झाली आहे.

प्रभाग २ मध्ये कल्पेश सुखलाल मोहिते (काँग्रेस), मनोज प्रजापती (शिवसेना), संभाजी शिवाजी माने (भाजपा) अशी तिरंगी लढत होणार असून आज काँग्रेसचे अमित संतोष भुवड आणि शिवसेनेचे साहिल मधुकर जाधव यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत. प्रभाग ८ मध्ये सोनाली प्रकाश गायकवाड (शिवसेना), अनिता राजन जांभळेकर (काँग्रेस), धुमाळ रचना राजन (भाजपा) अशी तिरंगी लढत होणार असून काँग्रेसच्या समिधा संतोष महाडीक यांचा उमेदवारी अर्ज छाननीमध्ये अवैध ठरला आहे. प्रभाग १० मध्ये शुभांगी संतोष चव्हाण (काँग्रेस), प्रतिक नंदकुमार सुर्वे (भाजप), प्रसाद राजन इंगवले (शिवसेना) अशी तिरंगी लढत होणार आहे. आज छाननीमध्ये काँग्रेसचे अमित संतोष भुवड यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरला आहे. प्रभाग १४ मध्ये भाजपच्या अंकिता अरविंद जांभळेकर (भाजपा), प्रतिक्षा प्रसाद भूतकर (काँग्रेस), प्राची निलेश सुतार (शिवसेना) अशी तिरंगी लढत होणार असून काँग्रेसच्या समिधा संतोष महाडीक यांचा तसेच प्रतिक्षा प्रसाद भूतकर यांचा दुसरा उमेदवारी अर्ज अवैध ठरला आहे.

नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी सोमवार, दि. १० जानेवारी २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत मुदत आहे. मात्र, आता याठिकाणी तीनही राजकीय पक्ष जोमाने प्रचार करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दि.१८ जानेवारी २०२२ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदानप्रक्रिया घेण्यात येणार आहे. दि.२१ डिसेंबर २०२१ झालेल्या आणि दि. १८ जानेवारी २०२२ रोजी होणाऱ्या मतदानप्रक्रियेची मतमोजणी बुधवार, दि. १९ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १० वाजल्यापासून पोलादपूर तहसिल कार्यालयाच्या पहिल्या माळ्यावर होणार असल्याची माहिती यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड आणि सहायक निवडणूक अधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी दिली.

# उरण दिव्यांग एकजूट सामाजिक संस्थेच्या वतीने ना.आदिती तटकरे यांना निवेदन



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांना स्थानिक प्रकल्पात नोकरीमध्ये आरक्षण देणे, दिव्यांगाना व्यवसायासाठी ठिकठिकाणी स्टॉल उपलब्ध करून देणे, दिव्यांगाना व्यवसायासाठी स्थानिक कंपन्याकडून सी एस आर फंडातून अनुदान मिळावे, प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, दिव्यांगच्या व्यक्तीच्या मुलांचे शिक्षण फी कायमस्वरूपी माफ करावे, दिव्यांग व्यक्तींना विनामूल्य आरोग्य सेवा पुरविणे, रोजगारा करिता प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे आदी विविध मागण्यासाठी उरण दिव्यांग एकजूट सामाजिक संस्थेच्या वतीने अध्यक्ष महेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या पदाधिकारी सदस्यांनी द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनच्या युवा महोत्सव, बोकडवीरा येथे पालकमंत्री आदितीताई तटकरे यांची भेट घेऊन दिव्यांगाच्या सर्व समस्या सोडविण्यात याव्यात अशी मागणी करत त्यांना निवेदन दिले.

यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन आदितीताई तटकरे यांनी दिले. यावेळी उमेश नारायण पाटील, नितीन कडू, संतोष म्हात्रे, दीपक म्हात्रे, संदेश राजगुरू, हिरावती घरत, राजश्री घरत, महेश भोईर, आईशा खान, उल्हास दर्णे, मिल्टन मिरांडा, आप्पासाहेब वाहवल, राजेंद्र पाटील आदी संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# पाली महावितरणाच्या मनमानी कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाच्या महामारीत सर्वसामान्यांचे कंबरडे मोडतील असे अव्वाच्या सव्वा वाढीव वीज बिलांनी सुधागडवासीय जनता प्रचंड त्रस्त झाली आहे. वाढीव वीज देयके आणि विजवीतरणच्या भोंगळ कारभारामुळे जनतेत प्रचंड संताप दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील असंख्य नागरीक व महिलांनी लोकमान्य ग्राहक संरक्षण संस्था (महाराष्ट्र)च्या नेतृत्वाखाली आवाज उठविण्यास सुरवात केलीय. विजसमस्येवर नागरिकांनी दंड थोपडले आहेत. लोकमान्य ग्राहक संरक्षण संस्था (महाराष्ट्र)ने प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे.



सुधागड तालुक्यात महावितरणाने ग्राहकांने वेठीस धरून ग्राहकांची झोप उडविली आहे. हा गरीब तालुका असल्याने एक वेळचे जेवण मिळणे गरिबांना कठीण झाले आहे. भरमसाठ लाईट बिल, दोन महिने परिस्थितीमुळे बिल न भरल्यास व्याज आकारणी असा मिळून येणारा बिल भरणे ग्राहकांना नार्कीनऊ झाले आहे. आदिवासी ठाकूर वर्ग काही प्रमाणात लाईट बिना दिवस काढत आ–हेत. १० हजार, १५ हजार, काहिंना तर १ लाख बिल अंदाजे पाठविले जात आहे. काय आहे या गरिबांकडे? कोणती उपकरणे आहेत हे वरिष्ठांनी स्वतः येऊन पाहावे, बिल बरोबर आहे भरावेच लागेल अशी सक्ती केली जाते. नाहीतर मनमानी कारभार करीत नोटीस न देता लाईट तोडणे हे कितपत कायदयात बसते ते पाली महावितरणाने दाखवून दयावे, सुधागडातील जनता या समस्यांना कंटाळली आहे. आक्रोश चालू आहे. या आक्रोशाची दखल घेत लोक ग्राहक संरक्षण संस्थेने जनतेवर होणा–या अन्याया विरोधात आवाज उठविला असून महावितरणाला लेखी पत्र देऊन मनमानी कारभार बंद करून ग्राहकांना दिलासा दयावा. आठ दिवसांत विचार करून नोटीस न देता लाईट तोडणे बंद करावे आणि लेखी स्वरूपात कळवावे, न कळविल्यास संघटनेच्या वतीने ग्राहकांना घेऊन हजारोंच्या संख्येने न्याय मिळण्यासाठी ठिय्या आंदोलन छेडले जाईल.

या बाबत तहसिलदार, पोलीस स्टेशन यांना ही निवेदन दिले आहे. लोकशाहिच्या मार्गाने आंदोलन होईल. विज नियम कायदा २००३ नुसार विज ग्राहकांची विज तोडणी करण्याआधी त्यांना अगोदर १५ दिवसापूर्वी नोटिस देणे बंधणकारक असताना महावितरण सुधागड यांनी कोणतेही आगाऊ नोटीस न देता. ग्राहकांची विज तोडली जाते. हे कृत्य बेकायदेशीर आहे.

लवकरात लवकर या बाबींचे निवारण करण्यात यावे. ग्राहाकांच्या हक्कासाठी येत्या आठवडयात एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात येईल. वरील मुदयांचा गंभीरपुर्वक विचार महोदय आपणांसकडून करण्यात यावा तसेच संबंधित प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# तडीपार आरोपीवर पोलिसांचा तिसरा डोळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण करण्यासाठी तडीपारीच्या कारवाई कडे पाहिले जाते. एखाद्या व्यक्तीकडून किंवा टोळीकडून कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचू शकते, याची खात्री पटल्यानंतर पोलिस स्टेशनपातळीवर तडीपारींचे प्रस्ताव तयार केले जातात. हे प्रस्ताव नंतर सहायक पोलिस आयुक्तांकडे जातात. याठिकाणी सहायक पोलिस आयुक्त संबंधीत गुन्हेगारांविरुद्ध नोटीस प्रसिद्ध करून कारवाई का करू नये, याची विचारणा गुन्हेगाराला करतात. गुन्हेगारांनी आपले स्पष्टीकरण दिल्यास अथवा न दिल्यास हे प्रस्ताव कारवाईसाठी पोलीस उपायुक्तांकडे पाठवले जातात. पोलीस उपायुक्त हे वैयक्तिकरित्या सदर प्रकरणाची पडताळणी करतात. या व्यक्तीकडून समाजास, जन मानसास, लोकांना भय निर्माण होत असल्याबाबत खात्री झाल्यानंतर त्याला तडीपार करण्यात येते. ‘तडीपार’ गुन्हेगारांवर पोलिस कारवाई करत असतात. समाजात दहशत माजविणाऱ्यांना रोखण्यासाठी तडीपारी हे पोलिसांचे प्रभावी अस्त्र आहे. काही वेळेला तडीपार केलेले आरोपी पुन्हा जिल्ह्यात परत येतात, त्यांच्यावर पोलिसांकडून पुन्हा कारवाई केली जाते.

# म्हसळा नगर पंचायत निवडणूक ४ जागांसाठी ९ उमेदवारांचे अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ओबीसींच्या ४ आरक्षित जागांना स्थगिती मिळाली असता तेथे सर्वसाधारण जागेवर दिनांक १८ जानेवारी रोजी मतदान प्रकिया होणार असून दिनांक ३ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे अंतिम दिवशी ६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.या मध्ये ४ राष्ट्रवादीचे तर २ शिवसेनेच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.दिनांक ३० डिसेंबर रोजी काँग्रेसच्या तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

आज रोजी प्रभाग २ मधून राष्ट्रवादीचे दिवेकर संजय यशवंत, शिवसेनेचे बनकर प्रविण विनोद, सेनेचे शिर्के दिपल दिपक, प्रभाग क्रमांक ७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या बशारत फरहीन अब्दुल अझीझ, प्रभाग क्रमांक ८ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदानी सुमय्या कासम,प्रभाग क्रमांक ९ मधून राष्ट्रवादीचे उकये अब्दुल रहीम शाहिद यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्याकडे दाखल केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यासाठी प्रामुख्याने अलीशेट कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर, सभापती छाया म्हात्रे, उप सभापती संदीप चाचले, माजी सभापती नाझीम हसवारे, काँग्रेसचे फझल हलदे, नासिर मिठागरे, भाई बोरकर, माजी नगरसेवक सुहेब हलदे, सलीम चोगले, मुसद्दीक इनामदार, समीर उकये, साजिद इनामदार, सलीम बागकर, नईम दळवी, इस्माईल दोंदिलकर, यशवंत पवार, कासीम मेमन, नगरसेविका सरोज म्हशीलकर, मोहन किळजे, सदानंद काते, पांडुरंग दिवेकर, मंगेश म्हशीलकर, मोहम्मद पठाण आदी मान्यवर उपस्थित होते तर शिवसेनेच्या एक मेव उमेदवाराचे अर्ज दाखल करण्यासाठी तालुका प्रमुख सुरेश कुडेकर, जेष्ठ नेते बाळशेट करडे, माजी तालुका प्रमुख रविंद्र लाड, हेमंत नाक्ती, अमोल पेंडारी, विशाल सायकर, भाऊ खताते, काँग्रेस युतीचे डॉ. मुईज शेख, रविंद्र दळवी उपस्थित होते.प्रभाग क्रमांक २ मध्ये शिवसेनेचा दिपल शिर्के हे उमेदवार डमी असल्याने चारही जागांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध काँग्रेस सेना युती अशीच थेट लढत पहायला मिळणार आहे.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हाची जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची बैठक आज दि. ०४ जानेवारी २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली.

या बैठकीस अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकूटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.शाम कदम, मत्स्यव्यवसाय अधिकारी गणेश टेमकर व साकव संस्था, पेण चे संचालक अरुण शिवकर, जिल्हा एम.आय.एस. समन्वयक, श्रीमती अर्पिता पारेख आदि उपस्थित होते.

यावेळी साकव संस्था, पेण यांनी सादर केलेल्या पेण तालुक्यातील १० गावांच्या व्यवस्थापन आराखडयास जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीने मान्यता दिली व करण्यात येणाऱ्या कामांचा प्रगती अहवाल एक महिन्याच्या कालावधीमध्ये समितीसमोर मांडण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी दिल्या.

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) यांच्याकडील शासन निर्णय क्रमांक मग्रारो–२०१९/प्र.क्र. १४४/मग्रारो–०१, दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ अन्वये सामूहिक वनहक्क मान्यताप्राप्त ग्रामसभांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित केलेले आहे. या शासन निर्णयाबाबत जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी सामुदायिक वन अधिकार मान्यताप्राप्त वन हक्क धारकांना याची विस्तृत माहिती करुन देण्याबाबत सूचित केले. या शासन निर्णयामुळे वनहक्क प्राप्त जमिनीवरील सर्व कार्याचे नियोजन व खर्च ग्रामसभेचे मंजूरीने वन हक्क कायद्याच्या कलम ४(१)(ड) नुसार ग्रामसभेव्दारा गठीत कार्यकारी मंडळ करणार आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे, गावाच्या सामूहिक वनहक्क क्षेत्रांतील वनांची वाढ, जलसंधारण व वनहक्क धारकाचे उपजीविकेकरिता अंतर्भूत योजनांचा समावेश करुन केली जातील व याचे संनियंत्रण संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या मार्फत केले जाईल, अशी माहिती अलिबाग उपवनसंरक्षक कार्यालयाने दिली आहे.